Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl. No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी
शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email :- secretary.stateboard@gmail.com

Tel :- Chairman (p) :- STD (020)-25651751 EPABX :-(020)-25705000 Secretary(P) :-(020)-25651750

क्र.रा.म./परीक्षा-८/ ११९५
पुणे -४११००४
दिनांक -०५/०३/२०२१

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- एप्रिल-मे २०२१ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थ्यांची अतिविलंब/ विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत ...

संदर्भ:- जा.क्रं.रा.मं./परीक्षा-३/९१७ दिनांक २०/०२/२०२१ चे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र.१३ व ४६ अन्वये एप्रिल-मे २०२१ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस **नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी** विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह ऑनलाईन परीक्षेची आवेदनपत्र स्विकारण्याची मुदत दिनांक ०५/०३/२०२१ रोजी संपली आहे. सदर मुदत संपल्यानंतरही (१) श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाच्या कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु.५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या अगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रु.१००/- विशेष अतिविलंब शुल्क व तदनंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत रु.२०० प्रमाणे (शासनाचे क्र.एसएससी-२०११(१८५/११)/उमाशि-२ दिनांक ०२ फेब्रु २०१२ च्या पत्रानुसार) अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

**विलंब शुल्कानंतरची अति विलंब/विशेष अतिविलंब/अति विशेष अतिविलंब शुल्काची आवेदनपत्रे ही संबधित शाळेने व कनिष्ठ महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व प्राचार्य / मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची मूळ प्रत (Print Out) शुल्कासह विभागीय मंडळाकडे सादर करण्याबाबत संबंधित शाळांना/कनिष्ठ महाविद्यालयांना कळवावे. त्याप्रमाणे संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालये आवेदनपत्रे मंडळाकडे जमा करण्यास येतील अशा शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून नियमानुसार आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसांपर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अति विशेष अतिविलंब शुल्क घेण्यात यावे.**

| परीक्षा | अतिविलंब शुल्क प्रतिदिनी रू.५०/- | विशेष अतिविलंब शुल्क प्रतिदिनी रू.१००/- | अतिविशेष अतिविलंब शुल्क प्रतिदिनी रू.२००/- |
|---|---|---|---|
| उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा | सोमवार दिनांक ०८/०३/२०२१ ते बुधवार दिनांक १७/०३/२०२१ | गुरुवार दिनांक- १८/०३/२०२१ ते शनिवार दिनांक- २७/०३/२०२१ | रविवार दिनांक-२८/०३/२०२१ ते रविवार दिनांक- ०४/०४/२०२१ |
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) | सोमवार दिनांक ०८/०३/२०२१ ते शुक्रवार दिनांक १९/०३/२०२१ | शनिवार दिनांक- २०/०३/२०२१ ते बुधवार दिनांक- ३१/०३/२०२१ | गुरुवार दिनांक-०१/०४/२०२१ ते रविवार दिनांक- ११/०४/२०२१ |

* विभागीय मंडळाच्या परीक्षा शाखेने प्राप्त शुल्क व ऑनलाईन आलेली आवेदनपत्रे यांची तपासणी करणे आवश्यक राहील.

पुर्वीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे विशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट- अ) विहीत प्रपत्रांसह पाठविण्यात यावे. तसेच संदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावे व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी.

सोबत जोडलेल्या विहीत तक्यामध्ये विद्यार्थ्यांबाबतची संपूर्ण अचूक माहिती (कालावधी व दंडाची रक्कम) तपासून सदर तक्ता (परिशिष्ट- ब) मा. विभागीय अध्यक्ष यांच्या शिफारशी व स्वाक्षरीसह मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचे मंजूरीकरिता पाठविण्यात यावा. मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांच्या मंजुरीशिवाय सदर विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याबाबतही सर्व संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना कळविण्यात यावे.

माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला माहितीचा तक्ता (परिशिष्ट-अ) राज्यमंडळाकडे पाठविण्यात येऊ नये. तसेच इतर कागदपत्रेही राज्यमंडळाकडे पाठवू नयेत. (उदा. विद्यार्थ्यांचा अर्ज, वैद्यकिय दाखला इ.) याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात यावा.

राज्यमंडळ कार्यालयाकडून अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र स्विकारण्याची मंजुरी परीक्षा सुरु होण्यापूर्वी घेण्यात यावी. तसेच राज्यमंडळ कार्यालयाकडून परीक्षा सुरु होण्यापूर्वी मंजुरी देणे शक्य होईल, अशा बेताने अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काचे आवेदन पत्राचे तक्ते राज्यमंडळाकडे सादर करण्यात यावेत तसेच इ.१२वीचे दिनांक ०४/०४/२०२१ व इ.१०वीचे दि.११/०४/२०२१ नंतर ऐनवेळेस प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांसाठी प्राप्त दिनांकापर्यंत अतिविशेष अतिविलंब शुल्क रु.२००/- प्रतिदिन आकारण्यात यावे व त्यांची मंजूरी सबळ कागदपत्रासह प्रस्ताव पाठवून इ.१२वीचे दिनांक२२/०४/२०२१ व इ.१०वीचे दि.२८/०४/२०२१ पूर्वी मान्यता घेण्यात यावी.

कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४.

---

क्र. कोविमं/इ.12वी परीक्षा/7291
कोल्हापूर-416008
दिनांक- 8.3.2021

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली व कोल्हापूर.

इ.12वी एप्रिल-मे 2021 परीक्षेस नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त - आलेले खाजगी विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारणे संदर्भात वरील सुचनाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

विभागीय सचिव,
म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर